| | |
|---|---|
| | दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२३२८/२०२५ |
| | प्रिती वि. महाराष्ट्र शासन |
| | **CNR No. MHAU020195862025** |

## <u>निशाणी क्रमांक १ खालील आदेश</u>

०१. अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदया प्रमाणे प्रशासन पत्र (Letter of Administration), वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) व वारसाहक्क प्रमाणपपत्र (Succession Certificate ) मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

### अर्जामधील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

०२. अर्जदार यांचे वडिल **प्रविण भागवत** हे सन १९९२ साली मयत झाले आहे. त्यांच्या पश्चात अर्जदार यांची आई **उषा प्रविण भागवत** हया देखील सन २०२१ साली मयत झालेली आहे. तसेच अर्जदार यांचा एक भाऊ नामे **पंकज प्रविण भागवत** हा देखील अविवाहीत असतांना दिनांक २८/०२/२०१४ रोजी मयत झालेला आहे. मयत आई उषा प्रविण भागवत यांना अर्जदार हिच कायदेशिर वारस असुन तिच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाहीत. **मयत उषा प्रविण भागवत** हिच्या नांवे खालील परिशिष्ट प्रमाणे मिळकती आहेत.

**परिशिष्ठ–अ**

**अ–** महानगरपालिका हददीतील सिडको, घर नं. ई–३६/२, एन–६, सिडकोच्या ६ गृह निर्माण योजनेतील ए–१२० प्रकारचे घर हे **मयत उषा प्रविण भागवत** यांच्या नावे वाटप करण्यात आले होते. ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे–

पुर्वेस – ई ३६/३.

पश्चिमेस – ई ३६/१.

दक्षिणेस – देशमुखचे घर.

उत्तरेस – रस्ता.

**परिशिष्ठ–ब**

**ब–** महानगरपालिका हददीतील मौजे चिकलठाणा येथील गट नं. ६१० मधील सहन प्लॉट नं. २०३ ज्याचे क्षेत्र ६०० चौरस फुट असुन ५५.७६ चौरस मिटर आहे. ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे–

पुर्वेस – प्लॉट नं. २०२

पश्चिमेस – प्लॉट नं. २०४

दक्षिणेस – १५ फुटाचा रोड.

उत्तरेस – सहन जागा.

**०३.** सदर मिळकती हया अर्जदार यांच्या नावावर करण्याकरिता अर्जदार यांना प्रशासनपत्र सादर करण्याचे सांगण्यात आले. तसेच अर्जदार यांच्या **मयत आई नामे उषा प्रविणराव भागवत** यांचे सेवानिवृत्तीचे बँक खाते क्रं.

१११६२५८६३९४ एसबीआय शाखा टाऊन सेंटर, उद्योग भवन, औरंगाबाद यामध्ये जमा असलेली रक्कम २९,७००/- अर्जदार यांना मिळण्यासाठी संबंधीत बँकेने वारसाहक्क प्रमाणपत्र सादर करण्याचे सांगण्यात आले. त्यामुळे अर्जदारांना सदर मिळकतीबाबत प्रशासन पत्राची व सदर रक्कम काढण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असून त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी अंतिमत: विनंती केली की, अर्जदार यांच्या नांवे प्रशासनाचे पत्र व वारसाप्रमाणपत्र देण्यात यावे अशी विनती केली.

**०४.** प्रस्तुत प्रकरण दाखल झाल्यानंतर अर्जदारांच्या नावे प्रशासनाचे पत्र व वारसाहक्क प्रमाणपत्र देणेकामी जर कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो आक्षेप न्यायालयासमोर मांडावा यासाठी जाहीरनामा प्रसिध्द केला होता. तसेच दिनांक ०७/११/२०२५ रोजी ''दैनिक सामना'' या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस निशाणी क्र. ७ प्रमाणे प्रसिध्द करुन आक्षेप मागवण्यात आले होते. परंतु आजपर्यंत कोणाचीही व कोणतीही हरकत न्यायालयासमोर आलेली नाही. गैरअर्जदार यांना नोटीसची बजावणी करण्यात आलेली आहे. परंतु ते हजर न झाल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्यात येत आहे.

**०५.** अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या पृष्टयर्थ त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१० अन्वये दाखल केले आहेत. त्यांचे वडिल प्रविण भागवत यांचे मृत्यु प्रमाणपत्र **नि.क्रं.११** प्रमाणे आहे. त्यांची आई उषा यांचे मृत्यु प्रमाणपत्र **नि.क्रं.१२** प्रमाणे आहे. त्यांचा भाऊ पंकज भगवत यांचे मृत्यु प्रमाणपत्र **नि.क्रं.१३** प्रमाणे आहे.

दिनांक ०७.०९.१९९९ रोजीचा करारनामा **नि.क्रं.१४** प्रमाणे, त्यांची आई उषा हिचे पासबुकच्या पहिल्या पानाची नक्कल **नि.क्रं.१५** प्रमाणे, उषाबाई भागवत यांच्या हक्कात असलेले खरेदीखत **नि.क्रं. १६** प्रमाणे, त्यांचे आधारकार्डाची प्रत **नि.क्रं. १७** प्रमाणे आहेत. तसेच साक्षीदार क्रं. २ यांचा पुरावा नि.क्र.१८ वर देण्यात आला आहे. उषा भागवत यांनी साक्षीदारासमक्ष मृत्युपत्र करुन ठेवले होते. सदर मृत्युपत्र त्यांना दाखविण्यात आले. त्यावर साक्षीदार म्हणुन त्यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर मृत्युपत्र दिनांक ०५.११.२०१२ रोजी झाले होते. सदर मृत्युपत्र **नि.क्रं. १९** प्रमाणे आहे. तसेच अर्जदार यांनी निशाणी क्र.२० वर ई–फाईलींगद्वारे पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

**०६.** अर्जदारांनी दाखल केलेल्या वर नमुद कागदोपत्री पुराव्यावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदार हे मयत **उषा प्रविण भागवत** यांचे हिंदु वारसा कायद्यानुसार वारस आहेत. अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन **परिशिष्ट–अ** मधील सदर सिडकोची मिळकत ही मयत **उषा प्रविण भागवत** यांच्या नावे असल्याचे दिसते. सबब सदरील सदरील मिळकत ही सिडकोची मिळकत असल्यामुमळे त्याबाबत अर्जदार यांच्या नावे प्रशासन पत्र देणे न्यायोचित होईल. तसेच **परिशिष्ट–ब** मधील मिळकतीसाठी वारस प्रमाणपत्र देणे न्यायोचित होईल. तसेच मयत **उषा प्रविण भागवत** यांच्या नांवे सेवानिवृत्ती खात्यात असलेली रक्कम अर्जदार यांना मिळण्याकामी वारसाहक्क प्रमाणपत्र देणे न्यायोचित होईल. प्रस्तुत अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. सबब अर्जदार मागणी करत असल्याप्रमाणे मयत **उषा प्रविण भागवत** यांचे

कायदेशीर वारस असल्याने प्रशासन पत्र (Letter of Administration), वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) व वारसाहक्क प्रमाणपपत्र (Succession Certificate ) मिळणेस अर्जदार पात्र ठरतात. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार प्रिती मनोज पावटेकर ही मयत **उषा प्रविण भागवत** यांचे कायदेशीर वारस असुन **अ–** महानगरपालिका हददीतील सिडको, घर नं. ई–३६/२, एन–६, सिडकोच्या ६ गृह निर्माण योजनेतील ए–१२० प्रकारचे घर हे मयत उषा प्रविण भागवत यांच्या नावे वाटप करण्यात आले होते. सदरील मिळकतीबाबत अर्जदार यांच्या नावे प्रशासनपत्र (Letter of Administration) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर निर्गमित करण्यात यावे.

३) अर्जदार प्रिती मनोज पावटेकर ही मयत **उषा प्रविण भागवत** यांचे कायदेशीर वारस असल्याने मयत **उषा प्रविण भागवत** यांचे नांवे **ब–** महानगरपालिका हददीतील मौजे चिकलठाणा येथील गट नं. ६१० मधील सहन प्लॉट नं. २०३ ज्याचे क्षेत्र ६०० चौरस फुट असुन ५५.७६ चौरस मिटर ही मिळकत अर्जदार यांच्या नांवे हस्तांतरीत होण्यासाठी वारस प्रमाणपत्र (Heirship

Certificate) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर निर्गमित करण्यात यावे.

४) अर्जदार हे मयत **उषा प्रविण भागवत** यांचे कायदेशीर वारस असल्याने मयताच्या नावावरील जमा थकबाकी रक्कम रुपये २९,७००/- ही अर्जदार नारायण नागोराव कुलकर्णी यांना मिळण्याकरीता योग्य त्या न्यायालयीन शुल्काच्या आधारे वारसाहक्क (Succession Certificate) प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

५) अर्जदार यांनी अर्जाचा खर्च सोसावा.

६) अर्जदाराने भारतीय वारसा कायदयाचे कलम २९१(१) प्रमाणे मयताच्या वरील आदेशाच्या **अ-** महानगरपालिका हददीतील सिडको, घर नं. ई-३६/२, एन-६, सिडकोच्या ६ गृह निर्माण योजनेतील ए-१२० प्रकारचे घर हे मयत उषा प्रविण भागवत यांच्या नावे वाटप करण्यात आले होते सदर मिळकत प्रशासीत करण्याकरिता स्वत:ला बांधुन घेणारे बंधपत्र दयावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SHAIEKH TAJJUM SHAIEKH HAMID
Date: 2026.07.01 17:24:08 +0530

दिनांक :- ०१.०७.२०२६.

**(टी. एच. शेख)**
१२ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर),
औरंगाबाद.